International Journal of Researches in Social Science and Information Studies (IJRSSIS)
January 2014
Issue-1, Volume-2
Online Journal
ISSN No. 2347-8268

# बाबा मोहोड यांच्या कथांमधील स्त्रीजीवन दर्शन : एक आकलन

, वैशाली सुरकार
शिक्षक कॉलनी, तकीया वार्ड
भंडारा.

## सारांश :–

बाबा मोहोड यांनी काव्यलेखनाबरोबरच ललीत वाङ्मयाला सुद्धा स्पर्श केला. त्यांनी लिहिलेल्या लघुकथा यमुनीशेवंती व अरूणा या कथासंग्रहात प्रसिद्ध झाल्यात. या लघुकथांमध्ये प्रामुख्याने समाजातील वास्तविकतेचे दर्शन व त्याचबरोबर मुख्यत्वे स्त्रीजीवन दर्शन घडते.

प्रस्तुत संशाधन लेखांमध्ये त्यांच्या दोन्ही कथासंग्रहातील कथांमधील घडणाऱ्या स्त्री जीवनाचे विविध कंगोरे तपासण्याचा प्रयत्न केलेला आहे. समाजातील विधवा स्त्री, दारिद्रयाच्या खाईत लोटलेल्या स्त्रीच्या मनाची अस्वस्थता, सासुरवासीन स्त्रीची मानसिकता अशा अनेक पहेलूंना स्पर्श करणाऱ्या बाबा मोहोड यांच्या कथा वाचकांचे मन हेलावून सोडतात. दोन्ही कथासंग्रहातील स्त्रीजीवन दर्शन घडविणाऱ्या कथांचा संशोधकाने या लेखामध्ये आकलन मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे.

## बाबा मोहोड यांच्या कथांमधील स्त्रीजीवन दर्शन :–

बाबा मोहोड यांच्या 'यमुनी शेवंती' या कथासंग्रहातील 'यमुनी' नावाची पहिलीच लघूकथा याच आशयाची आहे. यात यमूनी, सकवार, चैत्या, अवचित, महादेव ही पात्रे गुंफलेली आहेत. 'यमुनी' नावाची ही स्त्री नवरा मेल्यामुळे आपल्या 'अवचित' नावाच्या लहान मुलाला घेवून जीवन जगते आहे. दिवसभर राब राब राबुन पोटभर अन्न खायला मिळत नाही. देवाची नित्य पूजा करावी, तो आपले सर्व दु:ख दूर करतो या आपल्या वडिलांच्या उपदेशानुसार ती उसने घेऊन देवाला प्रसन्न करण्यासाठी खर्च करते; पण दु:खच तिच्या पदरी येते. तिचे वडिल मरण पवतात. नवराही मरतो. सव्वा वर्षाच्या आपल्या लहान बाळाला घेऊन ती दारिद्रयात जीवन कंठत आहे.

ती म्हणते, 'देवानं रांडीचा दाल्ला मारावं पन लेकराचा बाप नाई माराव बाई' या वाक्यात एका मातेचा आक्रोश आहे. दु:ख आहे.

दुष्काळी परिस्थितीवर मात करण्यासाठी काढलेल्या मोर्च्यात ती सहभागी होते. यातच जर मी तुरूगांत गेली तर मला व माझ्या लहान बाळास निदान दोन वेळेचे खायला



A Four-monthly Journal By
Vishwashanti Multipurpose Society,
(Global Peace Multipurpose Society)

मिळेल, आपली चिंता मिटेल असे तीला वाटते. या कथेत एका दरिद्री स्त्रीची जगण्याची धडपड व लाचारी दिसून येते

दुसऱ्या कथेत म्हणजे 'शांता' यात स्त्री जन्माची करूण कहाणीच सांगिलेली आहे. 'शांता' नावाची स्त्री लग्न होउन श्रीमंत घरी येते. तिचा नवरा 'राजा' सदैव दारूचा आहारी गेलेला आहे. गावात तमाशा आला तर त्यातील महिला घरी आणणे; त्यांच्याशी वाटेल ते चाळे पत्नीच्या समोर राजरोसपणे करणे हेच त्याचे काम. सासरे सासू हे सर्व उघडया डोळयांनी पाहतात. नवरा त्याच्या लहानपणात वडिलांच्या मांडीवर बसून हे सर्व पाहात आलेला आहे त्यामुळे शांताची तक्रार करण्याची हतबलता आहे. श्रीमंत कुटुंबांत विवाह होऊनही हे भलतेच दुदैव व हालअपेष्ठा तिच्या पदरी पडल्या. सासू सुद्धा 'मी हे सर्व तुझ्या सासऱ्याकडुन सहन केले ते आता तुही कर याला तू अपवाद नाही' असा पवित्रा घेतलेली आहे. म्हणजे स्त्रीच्या नशिबी हे सर्व असतेच असे सगळे चित्रण या कथेत आहे.

स्त्री जन्मा तुझी कहाणी हृदयी अश्रु नयनी पाणी अशी कथा यात आहे. ''शिक्षा? कोणाला शिक्षा? कपाळावरच्या कुंकवाला? आणि मी जिवंत असतांना हे शक्य नाही!''

नवरा सतत मारहाण करतो. पण पोलीसांना ती खोटं सांगते व त्याला वाचवते. यातुन भारतीय स्त्रीची आपल्या कुटुंबाची इभृत वाया जावू नये म्हणुन केलेली प्रयत्नाची पराकाष्ठा दिसते.

'वीणा' या कथेत रंगा देशमुख व कमल जोशी अशी दोन पात्रे गुंफलेली आहेत. रंगा देशमुख व कमल जोशी यांचा विवाह हातो. तो एक बालविवाह असतो.

'वीणा' एका पाटलाची धाडसी व धीट पोरगी आहे. दोन वर्षे त्याचे सहजीवन होते. एका क्षुल्लक गोष्टी वरून त्यांच्यात वाद होतो व रंगा विहिरीत आत्महत्या करतो. कमल यावर दुःखी होते पण रंग्याची आठवण नेहमी तिच्या स्मृतीत आहे. तिने पुर्नविवाह केला नाही. समाजसेवेत ती व्यस्त आहे. समाजात प्रतिष्ठा आहे. आयुष्यात समाधान आहे पण नवरा नसल्यामुळे ती स्वतःला भंगलेली 'विणा' समजते.

या कथेत बालविधवेचे दुःख लेखकांने रेखाटले आहे.

'अलका' ही लघुकथा नोकरी करणाऱ्या स्त्रीच्या भोवती गुंफलेली आहे. अलका व अविनाश हे पतीपत्नी आहेत अलका नोकरी करते तर अविनाश सामाजिक कार्यकर्ता आहे. तो ध्येयवादी आहे. त्यांना तिन मुले आहेत. त्यात एक सहा महिन्याचे लहान बाळही आहे.

अल्का व अविनाश दोघांनाही घराकडे पूर्ण लक्ष दयायला वेळ नाही. दोघांची चिडचिड होते. मनाचा त्रागा होतो. अलकाला सारखे वाटते की आपण संसाराकडे संपूर्ण लक्ष दयावे व अविनाशने सामाजिक कार्यासारखे बिगर स्वार्थी काम करू नये. यातुनच त्यांच्यात वाद होतो. पण तिच्या मनाची घालमेल होते. एकीकडे तिचे मन म्हणते, ''ध्येयवादीपणा हा काही माणसाचा गुन्हा नाही तर दुसरीकडे ध्येयवाद हा जीवनाचा वाटाड्या की वाटमाऱ्या.. .''

पण अलका ही एक भारतीय स्त्री आहे याची तिला जाणीव होते व ती शांत होते. दोघेही ऐकमेकांना समजुन घेतात व अंगणी वसंत फुलण्याचा आनंद घेतात. नोकरी करणाऱ्या भारतीय स्त्रीच्या मनाची घालमेल यात चित्रित केली आहे.

'कसोटी' या लघुकथेत स्त्रीच्या जीवनाची खरी कसोटी सांगितलेली आहे. लीलावती चे लग्न सुखदेव या माणसाशी होते. दोघेंही आनंदाने संसार करतात. त्यांना मुलंही होते पण कालातरांने सुखदेव क्षयरोगाने ग्रस्त होतो. लीलावती माहेरी निघुन जाते. सुखदेव रूग्णालयात भरती असतो. त्या दरम्यानच्या काळात दोघांतील संपर्क तुटतो. पण नंतर ती त्याला शोधत शोधत रूग्णालयात येते. मुलंही आता तीन वर्षाचे झाले आहे. लिलावती आता पतीच्या सेवेत मग्न आहे. पतीच्या आजारपणात त्याला पत्नीची खरी ओळख पटते. म्हणुन 'स्त्रीला क्षणाची पत्नी व अनंत काळची माता' म्हटले आहे. हे कथेच्या पुढील वाक्यातुन प्रचितीस येते.

''आणि आता मला सारखं वाटत आहे. स्त्रीची पतीला ओळख होते ती त्याच्या आजारपणात शरीरातली वासना तेव्हा हळुच दुर झालेली असते आणि स्त्रीची सेवा व पतीची विनम्र सहानूभूती पाकोळीच्या पखांनो तिथे भिरभिरत असते.''

'वर्षा' या कथेत बाबा मोहोड यांनी स्त्रीच्या मातृत्त्वाचे दर्शन घडविले आहे. पत्नी व आई यातील फरक खुप कल्पकतेने या कथेत गुंफलेला आहे. 'शशी' हा भावनाप्रधान पूरूष आहे. तर 'उर्मिला' ही एक व्यवहारकुशल स्त्री आहे. शशी व उर्मिला पतीपत्नो आहेत.'शशी' व्यवसायाने शिक्षक आहे. पण त्याचबरोबर तो कवी आहे. उर्मिला सोबत त्याची खुपसे पटत नाही. पत्नीपेक्षा आईचे स्थान मोठे आहे. हेच तो मानतो. कवी असल्यामुळे वेदना विसरायला लावणारी एक शक्ती त्याच्याजवळ आहे ही त्याची समजूत आहे. उर्मिला व्यवहारी आह. शशीचे कवीमन भावूक मन यासाठी तिच्या ठायी जागा नाही; म्हणून शशीला त्याच्या अशिक्षित वृध्द व मृत वारलेल्या आईची सारखी आठवण येते. तिचे

शब्द त्याला आठवतात व तो दुःखी होते. ''माह्या शशी भोया आहे. शिकली बायको त्याचा संसार करल असा मले इस्वास नाही पण मी तुले कसं सांगु तुज मन कायले दुखवू?''

या शशीच्या आईच्या तोंडच्या वाक्यात आईचे मुलावरचे निरामय प्रेम दिसते. आज ती जिवंत असती तर तिच्या कुशीत मान खूपसून सारे दुःख विसरलो असतो, असे त्याला वाटते आईची जागा कोणीही घेवू शकत नाही. या कथेत आईचे ममत्व हे अथांग असते याची प्रचिती येते.

'लक्ष्मी' या कथेत बाबा मोहोड यांनी एका कष्टकरी मोलकरीण स्त्रीचे जीवन चित्रित केले आहे. लक्ष्मी नावाची ही मोलकरीण सारंगा तिचा नवरा, सदा तिचा मुलगा. बाबासाहेब या व्यक्तिकडे ती मोलकरणीचे काम करते. सारंगा मासे पकडायला समूद्रात जातो व पून्हा परत येत नाही. त्यानंतर ती आपल्या छोटया मुलाला घेऊन गिरगाव मध्ये एका लहानश्या झोपडीत राहते. तिचे मूल तापात फणफणत असतांनाही ती बाबासाहेबांच्या घरी कामाला जाते. बाबासाहेबांची पत्नी लक्ष्मीला म्हणते,

''आज अगदी वेळेवर आलीस''

हे ऐकल्यानंतर लक्ष्मीला रडू येते पण ती आपले दुःख मालकिणीला न सांगता निमूटपणे कामाला लागते. यात वैयक्तीक दुःख पचवून आपल्या कामाशी असलेली एका मोलकरीण स्त्रीची प्रामाणिकता दिसून येते.

'अरूणा' या कथासंग्रहातील 'कलंकिता' या लघुकथेत बाबा मोहोड यांनी शांता नावाच्या एका तरूणीच्या आयुष्याची कथा चित्रित केली आहे. शिक्षणासाठी वडील तिला मामाकडे ठेवतात. सदाशिव देशमुख हा तिचा मामेभाऊ. पुढे तिचे लग्न त्याच्यासोबत होतें. सदाशिवला पूढे जुगाराचे व्यसन लागते तो तुरूंगात जातो. पत्नीला नृत्याचे वर्गात शिकायला पाठवतो. हळुहळु तीला तमाशाच्या फडात नाचायला धाडतो. मामा मरण पावल्यानंतर तर परिस्थिती पुन्हा वाईट होते. नवरा तिला पैशासाठी परपुरूषांशी संग करायला लावतो. पुढे तोच तिचा व्यवसाय होतो.

''मी पापी आहे. अपवित्र आहे. अपवित्र आणि दुर्वर्तनी आहे. हे सारं मला समजतं. या धंद्यापासुन शंभर हात दुर उभं राहाव असेही मला वाटतं पण हे जग मला आधार देईन असं वाटत नाही कारण जगाच्या नजरेत मी एक विटाळलेली स्त्री आहे आणि अशा स्त्रीला जगण्याची कोणतीही सोय समाजानं शिल्लक ठेवलेली नाही.''

या तिच्या वाक्याने चुकीने वेश्या व्यवसायातील आलेल्या स्त्रियांची भिषण व विदारक सत्यता दिसून येते. प्रतिष्ठीत घराण्यातील स्त्रीयांकडे पाहण्याचा दृष्टीकोन दिसतो; तर नवरा कितीही वाईट असला तरी तो कुंकवाचा धनी आहे, अशी पक्की समजुत असलेल्या भारतीय स्त्रीची मानसिकता या कथेत दिसते.

'सासुरवाशीण' या कथेत बाबा मोहोड यांनी एका सासुरवाशीणीचे दु:ख लेखणीतून उतरविलेले आहे. राधा नावाची स्त्री आपल्या सासरी दु:खात आहे. सासू तिला खूप छळते. सूनेने सर्व त्रास मूकाटयाने सहन करावा अशी समजूत समाजात आहे त्याचेच प्रतिनिधीत्व ही कथा करते.

''ही कैदाशिण का अजून उठलीच नाही?''

अशी अंगणातुन सासू ओरडली. या वाक्यात सासूचा सूनेबद्दलचा समज किती खालच्या दर्जाचा आहे हे लेखक दाखवतात. राधेला माहेरच्या स्मृती सारख्या आठवतात. तिच्या डोळयात अश्रु येतात.

''रूणु झुणु पाखरा जा माझ्या माहेरा''

या ओळीत लेखक राधेची माहेरची आस दाखवितात. एक दिवस तर उन्हात राधेचा भाऊ राजीव तिला भेटायला येतो. पण तिच्या सासुच्या जोराजोरात बोलण्यामुळे त्याला तहान लागली असून सूध्दा पाणी न पिताच आल्यापावली तो परत जातो. ''राधा लहानपणीच मेली असती तर' असे उद्‌गारतो. यात भावाला बहीणीच्या हालअपेष्ठा पाहावत नाही. दोघोमधील अतुट प्रेम दिसते. या कथेत बाबा मोहोड यांनी एक जात्यावरचे गाणेही गुंफलेले आहे.

भाऊ बहिणीच्या दारी
भर उन्हाचा कहर
दोन पहर दुपार
टाकताच पाय दाटी
सासुरवास ये कानी
झाले काळजाचे पाणी !

यात कविने सासूरवासीणीचा त्रास व्यक्त करण्याचा प्रयत्न केला आहे.

'आई' या लघुकथेत एक तरूण आहे. तो शाळा मास्तर आहे. त्याला आई नाही. तो खेडयात राहतो. शेजारी राहणारी स्त्री त्याला आपली आई वाटते. एके दिवशी हा

तरूण आपल्या गच्चीत उभा राहतो. त्याचवेळेत ती आपले अंगण झाडत असते. तिची आणि याची दृष्टादृष्ट होते. ती याला म्हणते,

''बाबु आठवण झाली आईची''

हा म्हणतो 'नाही आई.' तरूणाला कृतकृत्य झाल्यासाखे वाटते सध्या हा तरूण त्या गावी राहत नाही. पण त्या आईची त्याला सारखी आठवण येते मधुन मधुन तिला भेटायलाही जातो.

आई या शब्दाची काय जादू आहे? हे येथे दिसते. जन्मादातीच फक्त आई असू शकते असे नाही तर रक्ताच्या नात्यापेक्षा मानलेली नातीही किती मोठी असू शकतात व प्रेम देऊ शकतात हे प्रस्तुत कथेतून प्रत्ययास येते.

'गुन्हेगार' या कथेत एक स्त्रीच्या हातून आलेल्या परिस्थितीमुळे नकळत अपराध कसा घडतो याचे चित्रण बाबा मोहोड यांनी केले आहे. या कथेत लेखकाने गिरजा तिचा मृतपावलेला नवरा महादेव व मुलगा गणपती अशी पात्रे गुंफलेली आहेत.

'गिरजा' दलित स्त्री आहे. तरूणपणीच तिचा नवरा मरतो. दोघांचे एकमेकांवर खुप प्रेम असते. ती विधवा होते मोलमजुरी करते. देवावर तिची श्रध्दा आहे. तिला गणपती नावाचा छोटा मुलगा आहे. एकदा घरात खायला नसल्यामुळे ती दुसऱ्यांच्या दळणातील पीठ काढते व मुलाला भाकरी करून देते. गावातल्या बायकांना हे कळते. त्या तिला शिव्या देतात.

''दळणातलं पीठ काढलं हा महान गुन्हा केल्याचा आरोप त्या तावातावानं तिच्यावर करीत होत्या'' या वाक्यातुन लेखकाने एका दलित गरीब स्त्रीकडे समाजाचा पाहण्याचा दृष्टीकोन दाखविला आहे. ''करणी तशी भरणी' आणखी एकजण म्हणाली.''

यावरून तिने केलेला गुन्हा मोठा आहे व त्याचे प्रायश्चित घ्यायलाच पाहिजे असाही संदेश मिळतो. पोटच्या पोटासाठी मनावर दगड ठेवुन केलेले कृत्य एका विधवा दलित व गरीब स्त्रीला समाजाच्या दृष्टीने एक गुन्हेगार ठरवितो असा प्रत्यय येतो.

'अरूणा' ही अरूणा या कथासंग्रहातील शेवटी लघुकथा आहे. एका सुशिक्षित सुनेची ही कथा आहे.

''माणसानं सारं काही व्हावं चांडाळाची मोलकरीण व्हावं, स्टेशनवरचा हमाल व्हावं, रस्त्यावरची भिकारीण व्हावं पण कुणाची सुन मात्र कधी होऊ नये''

या वाक्यानं सुरूवात झालेल्या या कथेत एका सुशिक्षित सुनेची कथा लेखकांने कथन केली आहे. अरूणा तिचे नाव आहे नवरा आपल्या वाचनविश्वात रमलेला आहे. कोणाचीही मध्यस्थी न करता विवाह केला म्हणुन अरूणाचे सासू–सासरे नाराज आहेत म्हणुन ते वेगळे राहतात. मुलींनी शिक्षण अजिबात घेऊ नये ही त्यांची विचारसरणी आहे. ती सासऱ्यांना आग्रहपुर्वक घरी घेऊन येते व खूप सेवा करते.

''अरूणा माझी सून नाही ती पोटची पोर आहे माझ्या!''

असे सासऱ्यांनी तिला म्हणावं असे सारखे वाटते. पण लवकरच तिचा भ्रमनिरास होतो. चवथ्या दिवशी ''मी तुझ्याकडे आजपासून जेवायला येणार नाही माझी सून म्हणुन तू कर्तव्य करशील एक मुलगी म्हणुन तिळाएवढं करणार नाही''

असे म्हणुन सासरे निघुन जातात. अरूणा दुःखी होते. पुन्हा तिला सारखे तेच वाटते की, माणसान सारं काही व्हावं पण कुणाची सून मात्र होऊ नये. या कथेत एका सुशिक्षित सुनेची सासुसासऱ्याकडून होणारी अवहेलना, त्यांचे मुलीच्या शिक्षणाबाबतीत असलेले गैरसमज, सून ही मुलगी कधी होऊ शकत नाही असा पक्का गैरसमज दिसतो.

वरील सर्व कथांमधे बाबा मोहोड यांनी स्त्रीजीवनातील विविध पैलू, तपासण्याचा प्रयत्न केलेला आहे. 'यमुनी' मध्ये विधवा गरीब स्त्रीची जगण्याची धडपड, 'शांता' मध्ये विवाहीत भारतीय स्त्रीची मानसिकता, 'वीणा' मध्ये बालविधवेचे दुःख, 'अलका' या लघुकथेत नोकरदार स्त्रीची तिचा संसार सांभाळण्याची लगबग, 'कसोटी' या कथेत आजन्म पतीच्या सेवेत वाहुन दिलेल्या स्त्रीची सेवाव्रतता, 'वर्षा' मध्ये आईचे महात्म्य, 'लक्ष्मी' मध्ये मोलकरीणीची कर्तव्यनिष्ठा, 'कलंकीता' मध्ये परिस्थितीमुळे देह विक्रीकरिता गेलेल्या स्त्रीचे दुःख, 'सासुरवाशीण' या लघुकथेत सासरी दुःखी असलेल्या स्त्रीची कथा, 'आई' या कथेत रक्तापेक्षा मानलेली नाती व त्यातही आईचे नाते किती उच्चकोटीचे असते हे दाखविले आहे. 'गुन्हेगार' या कथेत गरीबीमुळे एका दलित व गरीब स्त्रीवर चोरीची वेळ येते तर 'अरूणा' या लघुकथेत सुशिक्षित सुनेची जुन्या विचारसरणीच्या सासुसासऱ्यांकडुन झालेली अवहेलना चित्रित केली आहे.

संदर्भ टिपा :

१. मोहोड बाबा, 'यमुनी शेवंती', वंदन प्रकाशन, अमरावती 1992.

२. तत्रैव, 'शांता' वंदन प्रकाशन, अमरावती 1992.

३. तत्रैव, 'अलका', वंदन प्रकाशन, अमरावती 1992.

४. तत्रैव, 'कसोटी' वंदन प्रकाशन, अमरावती 1992.

५. तत्रैव, 'वर्षा' वंदन प्रकाशन, अमरावती 1992.

६. तत्रैव, 'लक्ष्मी' वंदन प्रकाशन, अमरावती 1992.

७. तत्रैव, 'कलंकिता' वंदन प्रकाशन, अमरावती 1993.

८. तत्रैव, 'सासूरवाशीण' वंदन प्रकाशन, अमरावती 1993.

९. मोहोड बाबा, 'अरूणा', 'आई' वंदन प्रकाशन, अमरावती 1993.

१०. मोहोड बाबा, 'अरूणा', 'अरूणा', वंदन प्रकाशन, अमरावती 1993.

११. मोहोड बाबा, 'यमुनी शेवंती', 'जानकु' वंदन प्रकाशन, अमरावती 1982.

१२. तत्रैव, 'शेवंती' वंदन प्रकाशन, अमरावती 1982.

१३. मोहोड बाबा, 'अरूणा', 'बयना' वंदन प्रकाशन, अमरावती 1982.

१४. तत्रैव, 'अपशकुनी', वंदन प्रकाशन अमरावती 1993.

१५. मोहोड बाबा, 'यमुनी शेवंती', 'रेखा' वंदन प्रकाशन अमरावती 1993.